## दृष्टिक्षेपात

### मत्स्य व्यावसायिकांना कृषी दर्जामुळे लाभ

**मुंबई :** राज्यातील मच्छीमार, मत्स्यसंवर्धक यांना कृषी क्षेत्राप्रमाणे अनेक पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्यासाठी मत्स्य व्यवसायाला कृषी दर्जा देण्याचा निर्णय काही दिवसांआधी राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. व आज त्या निर्णयाचा राज्य सरकारने शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे मत्स्य शेतकरी, मत्स्य संवर्धन प्रकल्प यांना कृषी दराने सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येणार आहे. मत्स्य शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड याचा लाभ दिला जाणार आहे. बँकांकडून कृषी दराने कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रानुसार अल्प दराने विमा संरक्षणाचा लाभही मत्स्य क्षेत्रात देण्यात येणार आहे.

### जवान सचिन वनंजे यांच्यावर अंत्यसंस्कार

**नांदेड :** सैन्य दलातील जवान सचिन यादवराव वनंजे यांचा देशसेवेच्या कर्तव्यावर असताना श्रीनगरच्या परिसरात मंगळवारी (ता.६) अपघातात त्यांचा मृत्यू झाला. देगलूर येथे शुक्रवारी साश्रूनयनांनी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. लष्करी वाहनातून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली.

### ‘सौर कृषी’तील ११ प्रकल्प कार्यान्वित

**नंदुरबार :** राज्यातील सौरऊर्जा निर्मितीत ‘महावितरण’च्या जळगाव परिमंडलानेही मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० मध्ये ११ प्रकल्पातून ५४ मेगावॉट सौरऊर्जेचे योगदान दिले आहे. याद्वारे सुमारे १३ हजार ५०० शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याची सोय झाली आहे.

### मराठी विद्यापीठाचे जूनपासून पहिले सत्र

**अमरावती :** मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर आता श्रीक्षेत्र रिद्धपूर येथील देशातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठातील शैक्षणिक सत्रास येत्या जूनमध्ये प्रारंभ होत आहे. या सत्रामध्ये चार प्रशालांचे (विद्याशाखांचे) अभ्यासक्रम शिकवण्यात येणार असून ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

### मोटार अपघातात बाप-लेकाचा मृत्यू

**बीड :** पुलाच्या कठड्याला धडकल्यानंतर मोटार खासगी आराम बसवर आदळल्याने बाप-लेकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना पाटोदा शहरानजीकच बामदळवाडा परिसरात गुरुवारी (ता. आठ) मध्यरात्री घडली. अल्ताफ अशपाक शेख (वय ४२) व अलमस अल्ताफ शेख (वय १५, दोघे, रा. पुणे) अशी मृतांची नावे आहेत.

### दुकानदाराचा मुलीवर अत्याचार

**डोंबिवली (जि. ठाणे) :** चित्रीकरण पाहण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीला रात्रभर दुकानात डांबून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली. या प्रकरणी दुकानदार गणेश म्हात्रे (वय २१) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली.

# चर्चा करूनच एकत्रीकरणाबाबत निर्णय

## सुप्रिया सुळे; युद्ध परिस्थितीत आम्ही भारत सरकार आणि सैन्याच्या पाठीशी

**सातारा, ता. ९ : ‘‘दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याबाबत शरद पवार यांनी कोणत्या संदर्भाने वक्तव्य केले, हे पाहावे लागेल. दोन्ही गट एकत्र आणण्याबाबत मी एकटी निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी कार्यकर्त्यांशी बोलावे लागणार आहे. सर्वांशी चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल,’’ असे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार ) पक्षाच्या नेत्या, खासदार सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, भारत-पाक युद्धजन्य परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून आम्ही पूर्ण ताकदीने भारत सरकार व भारतीय सैन्याच्या पाठीशी आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व सर्वसाधारण सभेच्या बैठकीसाठी सुप्रिया सुळे आज साताऱ्यात आल्या होत्या. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सुळे म्हणाल्या, ‘‘शरद पवार यांनी नेमके काय वक्तव्य केले याबाबत मला काहीही माहिती नाही. प्रातिकरातील नवीन कायदा येत आहे. त्यासंदर्भातील महत्त्वाच्या बैठकीसाठी मी काल दिवसभर दिल्लीत होते. त्यामुळे शरद पवार यांनी जे वक्तव्य केले, त्यावर मी काहीही बोलू शकत नाही.’’

‘‘शरद पवार यांनी कोणत्या संदर्भाने आपले मत मांडलंय, याची मला माहिती घ्यावी लागेल. त्यानंतरच मी त्यावर भाष्य करेन,’’ असे त्यांनी स्पष्ट केले.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या निर्णयाबाबत दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांत उत्साह आहे, यावर सुळे म्हणाल्या, ‘‘विविध कार्यक्रमांच्या निमित्त दोन्ही गटांचे कार्यकर्ते एकत्र येत असतात. त्यामुळे दुसऱ्याला आनंद देणे हे कार्यकर्त्यांना वाटत असते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत मी एकटी निर्णय घेऊ शकत नाही. यासंदर्भात कार्यकर्त्यांशी बोलावे लागणार आहे. पक्ष संघटनेत काम करताना कोणा एकाला निर्णय घेता येणार नाही. सर्वांशी चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल.’’



### विरोधी पक्षाचा पाठिंबा...

- **इंडिया आघाडीत समन्वय नाही, असे बोलले जात आहे, याविषयी सुळे म्हणाल्या, ‘‘इंडिया आघाडीत लोकसभा, राज्यसभेत चांगला समन्वय आहे. काल सर्वपक्षीय बैठकीसाठी आम्ही सर्वजण एकत्र गेलो होतो. त्या वेळी आमच्या सगळ्यांचा निर्णय होता, जो काही भारत सरकार निर्णय घेईल, त्याला जबाबदार विरोधी पक्ष म्हणून आम्ही पाठिंबा दिलेला आहे. यात कोणतेही राजकारण आम्ही करणार नाही.’’**

## ‘आमदारांशी चर्चा करूनच सुप्रियाताई निर्णय घेतील’

‘‘पक्षात पुढच्या पिढीला जबाबदारी दिली पाहिजे, त्यातूनच खासदार शरद पवार यांनी सूचक वक्तव्य केले आहे. सुप्रियाताई या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा आहेत. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रीकरणाबाबत त्या पक्षाच्या आमदारांशी चर्चा करतील. चर्चेत काय निर्णय होईल हे ज्या त्या वेळी पाहिले जाईल’’, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी (ता. ९) व्यक्त केले.



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमासाठी ते आज साताऱ्यात आले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास आश्चर्य वाटायला नको, या शरद पवार यांच्या वक्तव्याबाबत रोहित पवार म्हणाले, ‘‘कार्यकर्त्यांची कामे झाली पाहिजेत. ही कामे करण्यासाठी सत्तेत गेले पाहिजे, अशी चर्चा आमदारांकडून झाली असावी. त्यातूनच शरद पवार यांनी मुलाखतीत असे बोलले असावेत. शरद पवार ज्यावेळी यासंदर्भाने बैठक बोलावतील, त्या वेळी त्यांच्यापुढे मत मांडेन. राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या प्रक्रियेत मी नाही.’’

## ‘राष्ट्रवादी’ एकत्र आल्यास आक्षेप नाही : सपकाळ

■ **सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ९ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दोन्ही गट एकत्र येत असतील तर त्यावर आक्षेप असण्याचे काही कारण नाही. दुभंगलेले मने, दोन भाऊ आणि पक्ष एकत्र येत असतील तर हरकत नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त करत प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राजकीय हालचालींचे सूतोवाच केले. मात्र यावर इतक्यात वक्तव्य करणे योग्य नसून काही ठोस समोर आल्यावरच त्यावर प्रतिक्रिया देणे उचित होईल, असे ते म्हणाले.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याच्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना सपकाळ म्हणाले, ‘‘काँग्रेस पक्ष भाजपविरोधात लढत आहे, शरद पवार हे इंडिया आघाडीचे एक महत्त्वाचे नेते आहेत. काही राजकीय घटना घडली तर त्यानंतर भूमिका घेता येईल.’’ काँग्रेस पक्ष ‘भारत जोडो’चा विचार घेऊन पुढे जात आहे, लोकशाही व राज्यघटनेचे संरक्षण व संवर्धन करण्याचा प्रयत्न जे पक्ष करतील त्यांच्याबरोबर काँग्रेस असेल, असे सपकाळ म्हणाले.

# माझा ‘तो’ निर्णय महिलांनी सार्थ ठरविला

## शरद पवार : ‘ऑपरेशन सिंदूर’मधील महिला अधिकाऱ्यांच्या सहभागाचा आनंद

**सातारा, ता. ९ :** ‘‘देशाचा संरक्षणमंत्री असताना लष्करात महिलांना प्रवेश नव्हता. तीनही सुरक्षा दलांच्या दर आठवड्याच्या बैठकीत मी तीन वेळा मुलींना लष्करात स्थान देण्याबाबत विचारणा केली. त्यावर त्यांनी नकार दिला. चौथ्या वेळी संरक्षण मंत्री म्हणून मी स्वत: निर्णय घेतला. लष्करात मुलींना नऊ टक्के आरक्षण सुरू केले. या क्षेत्रात गाजवीत असणाऱ्या महिलांनी माझा तो निर्णय सार्थ ठरविल्याचे ‘ऑपरेशन सिंदूर’मधील महिला अधिकाऱ्यांच्या सहभागावरून स्पष्ट होत आहे.’’ असे प्रतिपादन ज्येष्ठ नेत व माजी संरक्षणमंत्री शरद पवार यांनी केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथील कर्मवीर समाधी परिसरात शुक्रवारी आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आमदार दिलीप वळसे पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगिरथ शिंदे, संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील आदी उपस्थित होते.



**सातारा :** कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मारकाला अभिवादन करताना शरद पवार. त्या वेळी अजित पवार, रामशेठ ठाकूर, चंद्रकांत दळवी, विकास देशमुख, ॲड. भगीरथ शिंदे आदी.

पवार म्हणाले, ‘‘आपण शांतता प्रिय आहोत. युद्धाचा मार्ग आपला नाही. परंतु आपल्यावर हल्ले झाले तर, संरक्षणासाठी खबरदारी घेतोच. तीच आता घेतली जात आहे. लष्कराच्या कामगिरीचा अभिमान वाटतो. देशाच्या रक्षणासाठी आवश्यक ते सर्व केले जात आहे. सध्या सीमेवर होणाऱ्या घटनांची माहिती देण्याचे काम दोन महिला अधिकारी करत आहेत. त्यातील एक मुस्लिम आहेत. हिंदू, मुस्लिम, शिख, ख्रिस्ती हे सर्व घटक देशाच्या ऐक्यासाठी, संरक्षणासाठी पडेल ती किंमत द्यायला तयार आहेत, हे त्यातून स्पष्ट होते.

पवार म्हणाले, की कर्मवीरांनी तळागाळातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाचे दरवाजे खुले केले. शाळेचा पट कमी होत आहे. पटसंख्या कशी वाढेल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. संस्थेच्या देणगीदारांचा यावेळी सत्कार करण्यात आला. रयत मासिकासह विविध पत्रिकांचे प्रकाशन झाले.

## अमोल कीर्तिकर यांच्यासह आठ आरोपींवर आरोपपत्र

**मुंबई, ता. ९ :** कोरोना काळातील खिचडीवाटप गैरव्यवहारात आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी अमोल कीर्तिकर, सूरज चव्हाण, सुजित पाटकर, सुनील उर्फ बाळा कदम यांच्यासह आठ आरोपींविरोधात दंडाधिकारी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. हे सर्वजण शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील प्रमुख नेत्यांचे निकटवर्तीय मानले जातात.

कीर्तिकर यांनी ठाकरे यांच्या शिवसेनेतर्फे लोकसभा निवडणूक लढवली होती. सक्तवसुली संचालनालयानेही (ईडी) यातील काही आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे. खिचडीवाटपाचे कंत्राट मिळविण्यास पात्र नसताना राजकीय वलय वापरून आरोपींनी ते मिळवले, नियम धाब्यावर बसवून ३०० ऐवजी १०० ते २०० ग्रॅम खिचडीचे वाटप केले, खिचडीची पाकिटे जास्त दरात विकत घेऊन त्याबदल्यात महापालिकेकडून अधिक रक्कम उकळली, या कटकारस्थानावर पडदा पडावा म्हणून खोटी कागदपत्रे तयार केली गेली, असे आरोप आर्थिक गुन्हे शाखेने आरोपींवर ठेवले आहे. आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या आरोपपत्रात आरोपींनी कोरोना काळातील या कंत्राटात गैरव्यवहार करून १४.५४ कोटी रुपये गैरलाभाने कमावल्याचा दावा केला आहे.

### निकषांचे उल्लंघन

आरोपींनी खिचडीवाटप योजनेबाबत महापालिकेचे नियम, निकषांबाबत अंधारात ठेवून (करार न करता) ‘स्नेहा केटरर्स’च्या संजय माळी यांच्याकडून खिचडी बनवून घेतली. मात्र चौकशी सुरू झाली तेव्हा आरोपींनी बनावट कागदपत्रे पुढे केली, असा दावाही आर्थिक गुन्हे शाखेने केला आहे.



**बार्शी :** येथील देशातील एकमेव भगवंत मंदिरात श्री भगवंताचा प्रकट दिन सोहळा शुक्रवारी उत्साहात साजरा करण्यात आला. विष्णूचे रूप समजल्या जाणाऱ्या भगवंताची आकर्षक फुलांनी सजविलेली मूर्ती.

# ‘आरोग्य’वर नऊ हजार कोटींचा भार

## नवीन कामांवर होणार परिणाम ; कामे रद्द करणे हाच पर्याय

■ **सदानंद पाटील :**
सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. ९ : आर्थिक परिस्थितीचा विचार न करता गेली अनेक वर्षे आरोग्य संस्थांच्या बांधकामांमुळे सुमारे नऊ हजार कोटींचा बोजा तयार झाला आहे. मागील दोन अडीच वर्षांच्या काळात यात मोठी भर पडली आहे. जर सुरू न झालेली, अपूर्ण आणि अनावश्यक कामे रद्द केली नाहीतर पुढील किमान पाच वर्षे एकही नवीन काम आरोग्य विभागाला घेता येणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

आरोग्य विभागाच्या बांधकामासाठी वर्षाला अंदाजे ५०० कोटींची तरतूद आहे. मात्र दरवर्षी तरतुदीच्या अनेकपट कामे मंजूर करण्यात आली. परिणामी या बांधकामांचे नऊ हजार कोटींचे दायित्व तयार झाले आहे. अगोदरच रुग्णवाहिका, शववाहिका खरेदी, साफसफाई निविदेमुळे आरोग्य विभाग चर्चेत असताना आता बांधकामांच्या दायित्वाची भर पडली आहे. तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या कार्यकाळात बांधकामांना दिलेल्या मंजुरीचा विषयही चर्चेत आला आहे.

अर्थसंकल्पी तरतुदीचा मर्यादा विचारात न घेता उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ५०/१०० खाटांच्या रुग्णालयांच्या बांधकामांना मंजुरी देण्यात आली आहे. दरवर्षी अशा कामांना मंजुरी दिल्याने आजपर्यंत सुमारे नऊ हजार कोटींचे मोठे दायित्व तयार झाले असल्याचे सांगण्यात येत आहे. यातील साडेसात हजार कोटी राज्य सरकार तर एक हजार २५० कोटी रुपयांचे दायित्व राष्ट्रीय आरोग्य मोहिमेवर आहे. याबाबत विभागाच्या राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, प्रधान सचिव निपुण विनायक यांच्याही संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तो होऊ शकला नाही.

### नियम व वस्तुस्थिती

- **नवीन कामांना मंजुरी देताना किंवा जुन्या कामांना निधी देताना रीतसर प्रस्ताव देणे आवश्यक**
- **तालुका आणि जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य उपसंचालक यांनी शिफारस केल्यानंतर जिल्ह्यातून निधी मागणीचा प्रस्ताव येणे अपेक्षित**
- **अनेक कामांना जिल्ह्याची शिफारस नसताना किंवा जिल्ह्याच्या यादीत संबंधित कामे नसतानाही, कंत्राटदार भेटल्यानंतर ही कामे मंजूर केली**
- **तरतुदीपेक्षा अधिकची मंजूर झालेली कामे रद्द करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची**
- **जलसंधारण पाठोपाठ आरोग्याच्या कामांनाही कात्री लागण्याची शक्यता**
- **५० खाटांच्या रुग्णालय उभारणीचा खर्च काही ठिकाणी ४० कोटी रुपये तर काही ठिकाणी ७० ते ८० कोटी करण्यात येत आहे**

# एसटीच्या ताफ्यात हायब्रीड इंधनाच्या बस

■ **सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ९ : ‘‘एसटी महामंडळ दरवर्षी पाच हजार याप्रमाणे पुढील पाच वर्षांत २५ हजार बस घेणार आहे. यापैकी चालू आर्थिक वर्षापासून पुढील चार वर्षांत २० हजार बस या पर्यावरणपूरक ‘सीएनजी आणि ‘एलएनजी’सारख्या इंधनाबरोबरच डिझेल इंधन अशा हायब्रीड असतील. डिझेल इंधनाचा वापर केवळ आपत्कालीन परिस्थितीत केला जाणार असल्याने प्रवाशांची गैरसोय होणार नाही,’’ अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी येथे दिली. सरनाईक यांनी आज पर्यावरणपूरक इंधनासंदर्भात एसटी अधिकारी आणि संबंधित इंधन पुरवठादार संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली. ते म्हणाले, की एसटीच्या बहुतेक सर्व बस डिझेलवर चालणाऱ्या आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४ टक्के खर्च हा इंधनावर होतो. महामंडळाला दररोज सुमारे दहा लाख ७० हजार लिटर डिझेल लागते. परिणामी वर्षाला सुमारे ३४ हजार कोटी रुपयांचा खर्च इंधनावर होतो. भविष्यात डिझेल इंधनाची उपलब्धता आणि त्याच्या दरात वारंवार होणारा बदल लक्षात घेता पर्यायी इंधन वापरणे आवश्यक आहे.


**tifr टाटा मूलभूत संशोधन संस्था**
होमी भाभा रोड, कुलाबा, मुंबई - 400005
भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाची स्वायत्त संस्था आणि एक अभिमत विद्यापीठ

**जाहिरात क्र. 2025/7**
**गुरुवार, 29 मे 2025 रोजी सकाळी 9.30 वा. वॉक-इन-सिलेक्शनमध्ये सहभागी व्हा.**

विविध व्यवसायांच्या ट्रेड्समन प्रशिक्षणार्थींच्या सहभागासाठी वॉक-इन-सिलेक्शन अप्रेंटिस कायदा, 1961 अंतर्गत ट्रेड अप्रेंटिस. अधिक माहितीसाठी, कृपया http://www.tifr.res.in/positions या वेबसाइटला भेट द्या.

**निबंधक, टीआयएफआर**


# सव्वा कोटी शेतकऱ्यांना रोग नियंत्रण, पाणी, खते, हवामानाचा दैनंदिन सल्ला

## शेतीसाठी १ जूनपासून ‘एआय’चा वापर; अडचणींवर शेतकऱ्यांच्याच भाषेत मिळतील उत्तरे

■ **सकाळ वृत्तसेवा**


सोलापूर, ता. ९ : अचानक येणारी नैसर्गिक आपत्ती, नवनवीन रोग, किडीचा प्रादुर्भाव, पाण्याचे दुर्भिक्ष, वेळेत तज्ज्ञांचा न मिळणारा सल्ला, अशा बाबींमुळे शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहेत. त्यामुळे राज्यात दररोज सरासरी सहा ते सात शेतकरी आत्महत्या होत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा पैसा, श्रम व वेळेची बचत व्हावी म्हणून १ जूनपासून शेती क्षेत्रात ‘एआय’चा वापर केला जाणार आहे. राज्यातील सव्वा कोटी शेतकऱ्यांना आता प्रत्येक बाबींवर अचूक सल्ला मिळणार आहे.

शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन, सल्ला मिळाल्यास त्यांचे नुकसान कमी होईल. त्यांचे श्रम, वेळ व पैसा बचत होईल, या उद्देशाने राज्य सरकारने आता शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याचा निर्णय घेतला. त्यातून शेतकऱ्यांना माती परीक्षणापासून पिकांची लागवड ते पीक निघून बाजारपेठेत नेईपर्यंतची माहिती दिली जाणार आहे. हवामान अंदाज व घ्यायची खबरदारी, कीड, रोग नियंत्रण, असे पीक सल्ले एकत्रितपणे सर्व शेतकऱ्यांना दिले जातील. त्यासाठी जिल्हा ते सर्कल स्तरापर्यंतचा शेतकऱ्यांचा डेटा कृषी विभागाने संकलित केला आहे. ई-पीक पहाणीवरून पिकांची क्षेत्रनिहाय माहिती देखील कृषी विभागाकडे असणार आहे. त्यामुळे प्रत्येक भागातील शेतकऱ्यांना अचूक सल्ला ‘एआय’कडून दररोज दिला जाणार आहे.

नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्पाकडून त्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पावसाळ्यापूर्वी या तंत्रज्ञानाचा वापर सुरू होईल, असे कृषी विभागाकडून सांगण्यात आले.

### ‘या’ प्रमुख बाबींवर दररोज सल्ला

- **रोग, किडीच्या नियंत्रणासाठी कोणती औषधे फवारायची यावर माहिती**
- **कोणत्या पिकांना कोणत्यावेळी किती पाणी द्यायचे, यावर सल्ला**
- **पीकनिहाय कोणकोणत्या खतांचा डोस किती प्रमाणात द्यावा**
- **हवामान बदलाची माहिती देऊन त्यावेळी काय खबरदारी घ्यायची, यावर माहिती**



### शेतकऱ्यांसाठी केंद्राची ‘विस्तार’ प्रणाली

**राज्यातील विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र अशा विविध भागातील शेतकऱ्यांच्या भाषा वेगवेगळ्या आहेत. त्यांना त्यांच्याच भाषेत अडचणी, प्रश्न विचारता येतील आणि त्याच भाषेत त्यांना उत्तरे मिळतील, अशी विस्तार प्रणाली केंद्र सरकारकडून तयारी केली जात आहे. त्यासाठी ‘व्हाइस’चा पर्याय उपलब्ध असणार आहे. अशिक्षित शेतकरीसुद्धा त्यांच्या बोलीभाषेतून प्रश्न विचारू शकणार आहे.**

> पावसाळ्यापूर्वी शेतकऱ्यांसाठी ‘एआय’चा वापर सुरू केला जाणार आहे. त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान कमी होऊन त्यांचे श्रम, पैसा व वेळेची बचत होईल. शेतकऱ्यांची संपूर्ण पीकनिहाय माहिती कृषी विभागाकडे उपलब्ध आहे.
> - **गिरीश कुलकर्णी**, उपसंचालक, कृषी


Godrej Finance Limited
गोदरेज फायनान्स लिमिटेड
Godrej | FINANCE
गोदरेज | फायनान्स

सार्वजनिक सूचना

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - स्केल बेस्ड रेग्युलेशन) निर्देश, २०२३ च्या मास्टर डायरेक्टेशनच्या परिच्छेद ४३ नुसार ‘गोदरेज फायनान्स लिमिटेड’ द्वारे सार्वजनिक सूचना**

**गोदरेज फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "GFL") ही कंपनी कायदा, १९५६ (कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U67120MH1992PLC065457) अंतर्गत स्थापन झालेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे आणि ती भारतीय रिझर्व्ह बँकेत (COR. क्रमांक: १३.००३६८) नॉन-डिपॉझिट, नॉन-बँकिंग वित्तीय कंपनी ("NBFC") म्हणून नोंदणीकृत आहे. GFL चे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज वन, पिरोजनगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००७९, महाराष्ट्र येथे आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीचे शाखा कार्यालय माय ब्रांच सर्व्हिस प्रायव्हेट लिमिटेड, उत्तम टॉवर, सेंट अँड्र्यूज चर्चच्या बाजूला, शरणपूर, लिंक रोड, नाशिक- ४२२००५, महाराष्ट्र येथून कार्यालय - ४०६, चौथा मजला, मालपाणी आर्केड, सोपान हॉस्पिटलच्या बाजूला, श्री हरी कुटे मार्ग, तिडके कॉलनी, मुंबई नाका, नाशिक - ४२२००१, महाराष्ट्र येथे कामकाजाच्या कारणास्तव या सूचनेच्या तारखेपासून 3 महिन्यांपर्यंत स्थलांतरित केले जाणार आहे.

ग्राहकांच्या सर्व शंका **customercare@godrejcapital.com** या इमेल आयडीवर संबोधित केल्या जातील.

या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात श्री. योगेश जैन, मुख्य अनुपालन अधिकारी यांना पाठवलेल्या या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत किंवा **gfl.compliance@godrejfinance.com** वर संपर्क साधता येईल.

एसडी/-
**गोदरेज फायनान्स लिमिटेडच्या वतीने**

**स्थळ: मुंबई**
**दिनांक:10/05/2025**